श्री.गणेश राठोड,उपविभागीय अधिकारी,मेहकर यांचे कार्यालय

रा.प्र.क्र.एन.ए.पी.-34//सुलतानपूर/ 32 /2022-2023

अर्जदार :- नवोदय शिक्षण क्रिडा व सांस्कृतीक मंडळ, सुलतानपूर
तर्फे अध्यक्ष डॉ. हेमराज रामप्रसाद लाहोटी
रा. सुलतानपूर ता. लोणार जि. बुलडाणा

Sub-Divisional Officer Mehkar

# आदेश

(पारीत दिनांक : 24 /03/2023)
24/3/2023

सदरहू प्रकरण अर्जदार नवोदय शिक्षण क्रिडा व सांस्कृतीक मंडळ, सुलतानपूर तर्फे अध्यक्ष डॉ. हेमराज रामप्रसाद लाहोटी रा. सुलतानपूर ता. लोणार जि. बुलडाणा यांचे विनंती अर्जावरुन सुरु करण्यात आले अर्जदार यांचे मालकीची मौजे सुलतानपूर ता.लोणार येथील गट नं. 900 मधील 1.00 हे. आर म्हणजेच क्षेत्र 1000.00 चौ.मि. जमिन **शैक्षणीक** प्रयोजनाकरीता अकृषक करण्यास परवानगी मिळणेबाबत महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम,1966 चे कलम-44(1) नुसार अर्ज दाखल केला त्यावरुन सुरु करण्यात आले.

अर्जदार यांनी प्रकरणात गाव नमुना-7/12 उतारा,फेरफाराची नक्कल,मोजणी नकाशा,प्रस्तावीत अभिन्यासाची प्रत इत्यादी कागदपत्र दाखल केले. प्रकरणात दिनांक 09.11.2022 रोजी जाहिरनामा काढून हक्क व हरकती मागविण्यात आल्या असता विहित मुदतीत एकही हरकत अर्ज प्राप्त झाला नाही. सदरचा जहिरनामा तलाठी कार्यालय व तहसिल कार्यालयाचे नोटीस बोर्डावर लावून प्रसिध्दी दिल्याबाबतचे प्रसिध्दी अहवाल प्रकरणात दाखल करण्यात आलेले आहेत.

1) प्रकरणात जिल्हा पुनर्वसन अधिकारी,बुलडाणा यांचा अभिप्राय मागविण्यात आला असता त्यांचे कार्यालयाचे पत्र क्रं.कावि/पुनर्व/कक्ष-21/तलाठी/295/2022 दिनांक 01.12.2022 अन्वये नाहरकत दिलेली आहे.

2) प्रभारी अधिकारी,भुसंपादन अधिकारी,बुलडाणा यांचे अभिप्राय मागविण्यात आला असता त्यांचे कार्यालयाचे पत्र क्रं.कावि/कक्ष7:2/अका/312/2022 दिनांक 28.11.2022 अन्वये नाहरकत दिलेली आहे.

3) प्राथमिक आरोग्य केंद्र, सुलतानपूर यांचा अभिप्राय मागविण्यात आला असता त्यांनी आजरोजी पर्यंत त्यांचा अभिप्राय दिलेल नाही. सबब त्याची काहीही हरकत नाही असे गृहीत धरण्यात येत आहे.

4) कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ शिबीर कार्यालय, मेहकर यांचा अभिप्राय मागविण्यात आला असता आला असता त्यांचे कार्यालयाचे पत्र क्रं. म.रा.र.वि.म./म/201/2022 दिनांक 11.11.2022. अन्वये नाहरकत अभिप्राय दिला आहे.

Scanned with OKEN Scanner

5) कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी मर्यादित, खामगाव यांचा अभिप्राय मागविण्यात आला असता त्यांनी आजरोजी पर्यंत त्यांचा अभिप्राय दिलेल नाही. सबब त्याची काहीही हरकत नाही असे गृहीत धरण्यात येत आहे.

6) प्रकरणात तलाठी सुलतानपूर व मं. अ. यांचा अभिप्राय मागविण्यात आला असता त्यांचा दिनांक 16.02.2023 त्यांचा अभिप्राय प्राप्त.

7) प्रकरणात सहायक संचालक नगररचना, बुलडाणा यांचा अभिप्राय मागविण्यात आला असता त्यांनी आजरोजी पर्यंत त्यांचा अभिप्राय दिलेल नाही. सबब त्याची काहीहि हरकत नाही असे गृहीत धरण्यात येत आहे.

वरील बाबीं विचारात घेता तसेच प्रकरणात दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता अर्जात नमुद केलेली मौ. सुलतानपूर ता. लोणार येथील गट नं. 900 मधील अर्जदार यांचे मालकीचे क्षेत्र 1.00 हे.आर म्हणजेच क्षेत्र 10000.00 चौ.मिटर जमिन ही अर्जदाराचे मालकीचे व ताब्यातील असून **शैक्षणीक** प्रयोजनाकरीता अकृषक करण्यास व प्रस्तावीत अभिन्यास नकाशाला मंजुरात देण्यास हरकत नाही. सबब मौ.सुलतानपूर ता. लोणार येथील गट नं. 900 मधील अर्जदार यांचे मालकीचे क्षेत्र 1.00 हे.आर म्हणजेच क्षेत्र 10000.00 चौ.मिटर त्याला खालीलप्रमाणे अकृषक आकारणी करुन **शैक्षणीक** प्रयोजनाकरीता अकृषक करण्यास परवानगी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम,1966 चे कलम-44 (1) नुसार खालील अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

शासन परिपत्रक क्र.एनएए-1005/प्र.क्र.-7/ल-5 मंत्रालय,मुंबई-400032 दि.23/10/2007 नुसार वर्ग-1 चे गावाचे अकृषक दर प्रती चौ.मि.ला 0.10 पैसे अकृषक आकारणी नुसार मौ. सुलतानपूर ता. लोणार येथील गट नं. 900 मधील अर्जदार यांचे मालकीचे क्षेत्र 1.00 हे.आर म्हणजेच क्षेत्र 10000.00 चौ.मिटरला प्रती चौरस मिटर 0.10 पैसे दराप्रमाणे रु.1000/- रुपये इतकी अकृषिक आकारणी करण्यात येत आहे.

**अ) अभिन्यास तयार केलेल्या जमिनीचा तपशील खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | अभिन्यासातील जमिनीच्या जागेचा तपशिल | सर्व्हे नंबर/ गट नंबर | क्षेत्रफळ चौ. मि. | अकृषिक आकारणी रु. पै. |
|---|---|---|---|---|
| 1 | गाव नमुना-7/12 नुसार एकूण क्षेत्र | 900 | 10000.00 | 1000.00 |
| 2 | ले-आऊटचे एकूण क्षेत्र | 900 | 10000.00 | 1000.00 |

Scanned with OKEN Scanner

ब) महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम,1966 चे कलम-117 नुसार माफ करावयाची अकृषिक आकारणी बाबत तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | अभिन्यासातील जमिनीच्या जागेचा तपशिल | सर्व्हे नंबर/ गट नंबर | क्षेत्रफळ चौ.मि. | अकृषिक आकारणी रु. पै. |
|---|---|---|---|---|
| 1 | नॅशनल हायवे रोड | 900 | 500.00 | 50.00 |
| 2 | प्ले-ग्राउंड चे क्षेत्र | 900 | 4000.00 | 400.00 |
| 3. | शाळेचा प्लॉट चे क्षेत्र | 900 | 5500.00 | 550.00 |

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-**

1) अभिन्यासातील भूखंडांचा उपयोग जागेवर अनुज्ञेय असलेल्या शैक्षणिक प्रयोजनासाठीच करण्यात यावा.

2) सदरील अभिन्यासास देण्यात आलेली परवानगी ही परवानगी दिल्यापासुन एक वर्ष कालावधीसाठी वैध राहील तदनंतर त्यास नियमानुसार मुदतवाढ घेणे बंधनकारक राहील.

3) सर्व नियोजीत रस्त्यांना योग्य प्रकारची गटारे बांधण्यात येऊन भूखंडामधील सांडपाण्याचा निचरा त्यायोगे करण्याची व्यवस्था अर्जदाराने केली पाहीजे.

4) विषयांकित जमीनीतुन दुरध्वनी वाहिनी जात असल्यास उक्त वाहीनी प्रस्तावाला बाधीत होणार नाही अशा रितीने संबंधीत विभागाच्या अद्यावत नियमानुसार आवश्यक त्या सामासिक अंतरावर / रस्त्याच्या कडेने स्थानांतरीत करावी लागेल.

5) सदर रेखांकनाचे जागेत सांडपाणी अथवा भुपृष्ठावरील पाणी वाहून नेण्यासाठी जे नैसर्गिक मार्ग असतील ते अबाधीत ठेवावे अथवा त्याची पर्यायी व्यवस्था करणे अर्जदारावर बंधनकारक आहे.

6) अभिन्यासातील भूखंडामध्ये बांधकाम करतांना प्रादेशिक योजना बुलढाणास लागू असलेल्या एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील बांधकाम विषयक नियमांचे पालन करावे.

7) सदर अभिन्यासातील खुल्या अथवा अन्य जागेत झाडे अस्तित्वात असल्यास विना परवाना तोडण्यात येऊ नयेत. रेखांकनातील नियोजन केलेल्या रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावण्याची व वाढविण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील.

8) पावसाच्या पाण्याचे जलसंवर्धन (RAIN WATER HARVESTING) ची व्यवस्था स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील.

9) अर्जदार यांनी सादर केलेली माहीती अथवा कागदपत्रे खोटी अथवा दिशाभूल करणारी असल्यास सदर परवानगी रदद समजण्यात येईल.

10) वरील पुर्तते व्यतिरीक्त अभिनयास परवानगी दिलेल्या तारखेपासुन एक वर्षाचे आत अर्जदारास खालील बाबींची पूर्तता करावी.

अ) जमीन उंच सखल असल्यास ती योग्य प्रकारे समपातळीवर आणणे.

आ) नियोजन रस्त्यात नाले, ओहोळ इ. असल्यास त्यावर सार्वजनीक वापरासाठी पुल बांधणे.

इ) विजेचे अथवा दूरध्वनीचे स्तंभ जे भूखंडात अथवा रस्त्यात येत असल्यास संबंधीत खात्याकडे आवश्यक खर्च भरुन त्याची फेर आखणी करुन रस्त्याच्या बाजूला घेणे.

Scanned with OKEN Scanner

11)जागेवर बांधकाम करते वेळी सक्षम प्राधिकरणाची परवानगी घेणे बंधनकारक राहील व मंजूर विकास योजनेच्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीचे पालन करणे बंधनकारक राहील.

12)प्रकरणातील भूखंडामध्ये बांधकाम क्षेत्र चटई क्षेत्र निर्देशांक 0.20 अनुज्ञेय राहील.

13)प्रस्तावित जागेतील वृक्षाचे संरक्षण करता, भुखंड धारक संस्थेने 250 वृक्ष प्रति हेक्टर लागवड करावी. व त्याचे संवर्धन करावे.

14) भविष्यात अभिन्यासातील भुखंडाचे विभाजन पूर्व परवानगी शिवाय करुन नये.

सही/-

**( गणेश राठोड )**

**उपविभागीय अधिकारी,मेहकर**

प्रतिलिपी :-

1. तहसिलदार,**लोणार** यांना माहितीसाठी व तालुका नमूना-2 नोंद घेण्यासाठी तसेच आवश्यक कार्यवाही करीता अग्रेषित.

2. उपअधिक्षक भूमिअभिलेख कार्यालय,**लोणार** यांना मोजणी,कमी जास्त पत्रक व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

3. तलाठी,**मौ.सुलतानपूर ता. लोणार** यांना माहितीसाठी व गांव नमूना-2 नोंद घेण्यासाठी तसेच आवश्यक कार्यवाही करीता अग्रेषित.

4. नवोदय शिक्षण क्रिडा व सांस्कृतीक मंडळ, सुलतानपूर तर्फे अध्यक्ष डॉ. हेमराज रामप्रसाद लाहोटी रा.सुलतानपूर ता. लोणार जि. बुलढाणा यांना माहितीसाठी अग्रेषित.

**( गणेश राठोड )**

उप-विभागीय अधिकारी

**उपविभागीय अधिकारी,मेहकर**

H R Lahoti

**Manager**

Dr R N Lahoti Convent (CBSE

School Sultanpur Tq.Lona

Dist Buldana

Avrmol.

**Principal.**

Dr. R. N. Lahoti Convent School

Sultanpur Tq. Lonar Dist. Buldana

(MR) Aff. No 1130324

Scanned with OKEN Scanner